दिनांक :

प्रति,

————————————

————————————

**विषय : ‘केदारनाथ’ या आगामी हिंदी चित्रपटाला प्रमाणपत्र देण्यात येऊ नये, याविषयी....**

महोदय,

‘केदारनाथ’ या आगामी हिंदी चित्रपटाचा ‘ट्रेलर’ आणि ‘टीझर’ नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. यातून या चित्रपटाविषयी काही गोष्टी लक्षात आल्या, ज्यातून वाद निर्माण करून प्रसिद्धी मिळवणे आणि चित्रपटाची कमाई करणे, असे स्वार्थी अन् समाजघातक हेतू दिसून येतात. या चित्रपटासंदर्भातील काही निरीक्षणे पुढे देत आहोत –

१. हा चित्रपट हिंदूंचे पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या श्री केदारनाथ या ठिकाणी वर्ष २०१३ मध्ये आलेल्या महापुराच्या सत्य घटनेवर आधारित असून एका काल्पनिक प्रेमकथेवर त्याचे चित्रीकरण करण्यात आले आहे.

२. या प्रेमकथेत ‘मन्सूर’ नावाच्या एका मुसलमान घोडेवाल्या तरुणाची भूमिका अभिनेता सुशांतसिंह राजपूत यांनी, तर हिंदु तरुणीची भूमिका सारा अली खान या अभिनेत्रीने केली आहे. सध्या भारतीय समाजात आंतरधर्मीय विवाहांना मान्यता देण्याची परंपरा नाही. हिंदू आणि मुसलमान दोन्ही समाज या विरोधात आहेत. अपवादात्मक परिस्थितीत असे विवाह होतात आणि त्यातही वाद होतात. मुसलमान समाजात तर अशा अनेक प्रसंगांत वेळप्रसंगी मुलीला जिवे मारण्याच्या घटना घडल्या आहेत. यालाच ‘ऑनर किलिंग’ संबोधले जाते. अशा नाजूक विषयांना हाताळतांना समाजभान राखणे आणि समाजात आणखी वाद निर्माण होणार नाहीत, याची काळजी घेणे आवश्यक असते; मात्र या चित्रपटातून ही काळजी तर सोडाच; पण जाणीवपूर्वक वाद निर्माण करणारे प्रसंग घेतल्याचे ‘ट्रेलर’च्या माध्यमातून लक्षात येते.

३. सध्या चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी विविध वाद निर्माण करायचे, त्यांच्यातून प्रसिद्धी मिळवायची आणि नंतर चित्रपटाचा गल्ला जमवायचा, असा एक अयोग्य पायंडा पडत चालला आहे. ‘केदारनाथ’ हा चित्रपटही याला अपवाद नाही. सध्या भारतीय समाजाला एक राष्ट्रीय स्तरावरील समस्या भेडसावत आहे, ती म्हणजे ‘लव्ह जिहाद’ ! याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, मुसलमान युवक हिंदु युवतींना विविध प्रलोभने दाखवणे, खोटे बोलणे, फसवणे आदींतून प्रेमाचे नाटक करतात; गुंगीचे औषध पाजून वा मैत्री करून नंतर शारीरिक शोषण करतात. त्या नंतर विवाह करून त्यांचे इस्लाममध्ये धर्मांतर केले जाते. असे या समस्येचे गंभीर स्वरूप आहे. या ‘लव्ह जिहाद’मध्ये आजवर सहस्रो हिंदु युवती बळी पडल्या आहेत. प्रत्यक्षात या चित्रपटात वरील प्रसंगांनुसार कथा दाखवली नसली, तरी हेतूतः मुसलमान तरुण आणि हिंदु तरुणी यांचे प्रेमप्रकरण रंगवले आहे. हे एकप्रकारे ‘लव्ह जिहाद’ला प्रोत्साहन दिल्यासारखेच आहे.

‘लव्ह जिहाद’च्या नावाने खोटा प्रचार केला जातो, असा दावा काही तथाकथित पुरोगामी आणि बुद्धीवादी अनेकदा करतात; मात्र केरळ उच्च न्यायालयाने लव्ह जिहाद अस्तित्वात असल्याचे म्हटले आहे. तसेच केरळचे (हिंदुत्वनिष्ठ नव्हे, तर) कम्युनिस्ट पक्षाचे माजी मुख्यमंत्री अच्युतानंदन् यांनीही केरळमध्ये ‘लव्ह जिहाद’च्या प्रकरणात २००० हून अधिक मुली बेपत्ता झाल्याचे मुख्यमंत्री असतांना मान्य केले होते.

४. ‘केदारनाथ’ या चित्रपटाच्या ‘ट्रेलर’मधील संवादही गंभीर आहेत. उदा. चित्रपटात अभिनेता आणि

अभिनेत्री यांच्या प्रेमप्रकरणाला घरातील मंडळींचा विरोध दाखवण्यात आला आहे. यामध्ये मुलीचे वडील ‘नहीं होगा ये संगम ! फिर चाहे प्रलय ही क्यों न आए !’, असे म्हणतांना दाखवले आहे. यानंतर अभिनेत्री सारा अली खान म्हणते, ‘जाप करूंगी, की आएं !’ यातून केदारनाथ येथे आलेला जलप्रलय हा जणू यांच्या प्रेमप्रकरणाला नाकारले, म्हणून आला होता, असे दर्शवण्याचा अश्लाघ्य प्रयत्न निर्मात्यांनी केला आहे. प्रत्यक्षात ’केदारनाथ भागात अधर्म माजला होता, म्हणून तेथे भगवंताने प्रलय घडवून आणला’, अशी या भागातील हिंदूंची श्रद्धा आहे. असे असतांना ‘मुसलमान तरुण आणि हिंदु तरुणी यांच्या प्रेमप्रकरणाला नाकारले, म्हणून प्रलय आला’, असे दर्शवणे अत्यंत निषेधार्ह आहे.

५. चित्रपटाची ‘टॅग लाईन’ (घोषवाक्य) ‘Love is a pilgrimage’ म्हणजे ‘प्रेम ही तीर्थयात्रा आहे’, हे आहे. भगवंताचे प्रेम आणि प्रेमप्रकरणांतील प्रेम हे वेगळे असते, इतकी साधी गोष्ट समजू शकत नाही, असे नाही; मात्र जाणीवपूर्वक याद्वारेही तीर्थयात्रेचे विडंबन करण्यात आले आहे. हिंदूंच्या तीर्थयात्रा किंवा तीर्थक्षेत्रे ही काय प्रेमप्रकरणांसाठी आहेत का ? निर्मात्यांना या चित्रपटातून काय संदेश द्यावयाचा आहे, हेच यातून दिसून येते.

६. प्रेमकहाण्यांवर आधारित अन्य कोणत्याही चित्रपटावर हिंदूंनी कधीही आक्षेप घेतलेला नाही; मात्र हिंदूंचे धार्मिक उत्सव, देवस्थाने आणि धार्मिक स्थळांचा वापर प्रेमप्रकरणे दाखवण्यासाठी करणे, म्हणजे एक चुकीचा संदेश समाजाला देण्यासारखा आहे. हे निषेधार्ह आहे.

७. प्रत्येक वेळी हिंदूंच्या धर्मपरंपरा, देवता, संत आदींच्या संदर्भात चित्रपटांमध्ये जाणीवपूर्वक अयोग्य दाखवून हिंदूंच्या धार्मिक भावनांचा अनादर केला जातो. त्याला कितीही विरोध झाला, तरी हिंदू सहिष्णू असल्याने अधिक काही करणार नाहीत, अशी निर्मात्यांची भावना झाली आहे. या उलट मुसलमान किंवा ख्रिस्ती यांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या, तर ‘सेन्सॉर बोर्ड‘सह शासनही त्वरित कारवाई करतांना दिसते. याची अनेक उदाहरणे आहेत.

अ. मुसलमानांच्या भावना दुखावणाऱ्या ‘विश्वरूपम्’ या तमिळी चित्रपटावर तमिळनाडू शासनाने बंदी घातली.

आ. ख्रिस्त्यांच्या भावना दुखावणाऱ्या ‘द दा विंची कोड’ या इंग्रजी चित्रपटावर गोवा शासनाने बंदी घातली.

इ. ‘कमाल धमाल मालामाल’ या चित्रपटात एक ‘फादर’ला कुत्र्याचे लग्न लावतांना दाखवण्यात आले होते. हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर या चित्रपटाला ख्रिस्त्यांनी विरोध केला होता. त्या वेळी हा चित्रपट माघारी बोलवला गेला. त्यामध्ये वरील प्रसंग वगळून तो पुन्हा प्रदर्शित करण्यात आला.

ई. अक्षयकुमार यांचा ‘एंटरटेन्मेंट’ या चित्रपटामध्ये विनोदी कलाकार जॉनी लिव्हर यांचे नाव ‘अब्दुल्ला’ होते. हे नाव मुसलमानांमध्ये पवित्र मानले जाते आणि या चित्रपटात या नावावरून अनेक विनोद केले गेले आहेत, असा आक्षेप असल्याने सेन्सॉर बोर्डाने निर्मात्यांना या पात्राचे नावच पालटण्यास सांगितले.

वरील उदाहरणे अत्यंत मोजकी आहेत; मात्र हिंदूंच्या देवता अथवा धर्म यांसंदर्भात कितीही विरोध झाला, तरी ना सेन्सॉर बोर्ड, ना शासन यासंदर्भात काही भूमिका घेते. कोणीही यावे आणि हिंदूंच्या भावना तुडवाव्यात, अशी स्थिती निर्माण झाली आहे. चांगली पटकथा, चांगले संवाद, चांगला अभिनय, चांगली गाणी आदी गोष्टींच्या आधारे चित्रपट चांगला होतो आणि चांगला व्यवसायही करता येतो, हे आता विस्मृतीत गेले आहे. वाद निर्माण करून, हिंदूंच्या भावना दुखावून, धर्मपरंपरांवर आघात करून चित्रपट बनवायचा, प्रसिद्धी मिळवायची आणि नंतर धंदा करायचा, असे सध्याच्या चित्रपट निर्मात्यांचे अत्यंत नीतीहीन समीकरण बनले आहे, हे वास्तव आहे.

‘केदारनाथ’ या चित्रपटाची कथा आणि त्यातील दृश्ये यांवर आक्षेप घेत काही स्थानिक भाविकांनी रुद्रप्रयाग येथील जिल्हा मुख्यालयासमोर आंदोलन केले. केदारनाथ येथील सतेराखाल आणि आजूबाजूच्या परिसरातील स्थानिक भाविकांनी आंदोलन करतांना फलक, दिग्दर्शक, नायक आणि नायिका यांचे पुतळे जाळले. देशभरात या चित्रपटावरून वादंग होण्यास आरंभ झाला आहे. केदारनाथ मंदिराच्या पुजाऱ्यांनीही याला तीव्र विरोध दर्शवत या चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी केली आहे.

**⁕ तरी या प्रकरणी आम्ही पुढील मागण्या करत आहोत –**

१. जनभावनांचा उद्रेक होण्यापूर्वी सेन्सॉर बोर्डाने या चित्रपटावर बंदी घालावी.

२. जोवर चित्रपटातील वादग्रस्त प्रसंग वगळून चित्रपट हिंदु संघटनांच्या किंवा धर्माचार्यांच्या शिष्टमंडळाला दाखवला जात नाही, तोवर चित्रपटाला प्रमाणपत्र देण्यात येऊ नये.

३. चित्रपटाच्या माध्यमातून हिंदूंची मंदिरे, श्रद्धास्थाने, धर्मग्रंथ आणि देवता यांचा वापर चुकीच्या पद्धतीने केला जाऊ नये, यासाठी केंद्रीय चित्रपट परिनिरीक्षण मंडळाने नियमावली बनवावी.

४. चित्रपटाची ‘Love is a pilgrimage’ ही ‘टॅग लाइन’ पालटावी.

वरील मागण्या पूर्ण न होता चित्रपटाला प्रमाणपत्र दिले गेल्यास, होणाऱ्या जनउद्रेकास केंद्रीय चित्रपट परिनिरीक्षण मंडळ जबाबदार असेल.

आपला नम्र,

संपर्क :